# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


दिनांक :- ०७/०२/२०१८

## जाहीर आवाहन

दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्था व प्रशासकीय कार्यालये, येथे कार्यरत असलेल्या वर्ग-३ व ४ कर्मचा-यांसाठी विभागीय क्रिडा व सांस्कृतीक कार्यक्रम स्पर्धा २०१८ चे आयोजन केले आहे. ही स्पर्धा **दिनांक १० व ११ फेब्रुवारी, २०१८ रोजी** औरंगाबाद येथे घेण्यात येणार आहे. या स्पर्धेचा कार्यक्रम व प्रवेशिकेसंबंधीची माहिती या कार्यालयाच्या www.dteau.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत.

सदर स्पर्धा या कर्मचा-यांच्या अंगी असलेल्या क्रिडा कौशल्य व कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांना त्यांच्या हक्काचे व्यासपीठ मिळावे या हेतूने मागील तीन वर्षापासून प्रत्येक वर्षी आयोजीत करण्यात येतात.वर्षागणिक या क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धेला मिळणारा प्रतिसाद वाढतच आहे. आपला उत्साह व प्रतिसाद पहाता या वर्षी सुध्दा आपण या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद द्याल या बाबत मला शंका नाही.या प्रसंगी मी या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व वर्ग-३ व वर्ग ४ कर्मचा-यांना आवाहन करू इच्छितो की त्यांनी त्यांच्या आवडीच्या क्रिडा प्रकारात वा कला प्रकारात भाग घेऊन ही क्रिडा स्पर्धा यशस्वी करावी. तसेच जे कर्मचारी हया क्रिडा स्पर्धेत स्पर्धक म्हणून भाग घेऊ इच्छित नाहीत त्यांनी प्रेक्षक म्हणून या कालावधीत औरंगाबाद येथे उपस्थित राहून त्यांच्या संस्थेतील स्पर्धक कर्मचा-यांना प्रोत्साहन द्यावे.

सर्व शासकीय संस्थेच्या प्राचार्यांना या प्रसंगी आवाहन करू इच्छितो की त्यांनी हया स्पर्धेची माहिती त्यांच्या संस्थेतील कर्मचा-यांना कळवावी व बैठक घेऊन आपल्या संस्थेतील जास्तीत जास्त कर्मचा-यांना विविध क्रिडा प्रकारात व सांस्कृतीक कार्यक्रमाला उपस्थित रहाण्याबद्दल आवाहन करावे व कार्यक्रम यशस्वी करण्यास आपला हातभार लावावा.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

**टीप :- गत ०२ वर्षाप्रमाणे ही स्पर्धा सार्वजनिक सुटटीच्या दिवशी आयोजित केली असुन स्पर्धेत भाग घेण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही तसेच आपला सहभाग स्वेच्छेने व उत्स्फुर्तपणे अपेक्षित असून कोणताही प्रवास भत्ता, इतर भत्ते, मानधन देय राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**